# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २२/०३/२०१७

## *आज पासून गडचिरोली जिल्हा पोलीस भरती प्रक्रिया सुरु*

- *भरती संदर्भात अडचणीकरीता ८८०६३१२१०० हेल्पलाईन क्रमांक*

आज दिनांक २२/०३/२०१७ रोजी पासून गडचिरोली जिल्हा पोलीस भरती प्रक्रिया अंतर्गत पुरुषांची शारिरीक व मैदानी चाचणी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरु झाली आहे.

सदर भरती प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शकरित्या घेण्यात येत आहे. सदर भरती प्रक्रियेमध्ये RFID (Radio Frequency Identification) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. या तंत्रज्ञानामुळे १०० मी. व १६०० मी. धावणे प्रक्रियेची वेळ अचूक टिपण्यास मदत होत आहे. सोबतच पहिल्यांदाच उमेदवारांच्या बोटांचे ठसे घेऊन त्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यात येत आहे. याचबरोबर संपुर्ण भरती प्रक्रिया ही CCTV कॅमेराच्या निगराणीमध्ये होत आहे. जिल्हा पोलीस दलात भरण्यात येणाऱ्या एकूण १६९ पदांकरीता २८ हजार उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरले आहेत. सदर पोलीस भरती प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ४०० हुन अधिक पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मैदानावर प्रत्येक चाचणीच्या ठिकाणी CCTV कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. आज शारिरीक व मैदानी चाचणी करीता दीड हजार उमेदवारांना पोलीस मुख्यालय येथे बोलविण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी ही एकूण दीड हजार उमेदवारांना बोलविण्यात आले आहे. तर तिसऱ्या दिवशी पासून एकुण तीन हजार उमेदवारांना भरती प्रक्रियेकरीता बोलविण्यात येणार आहे.

उमेदवारास भरती प्रक्रियेसंबंधी कोणतीही अडचण असल्यास ८८०६३१२१०० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. उमेदवारांनी भरती दरम्यान कसल्याही प्रकारच्या प्रलोभनांना बळी पडू नये. जर उमेदवारास कोणी कसल्याही प्रकारचे प्रलोभन देत असल्यास त्याने गडचिरोली पोलीस दलाच्या सदर पोलीस भरती हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.









